**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ (वादी क्रमांक ०२) नामे पंडीत हनुमंत विटकर यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादीचे सुविद्य विधिज्ञ श्री. एन. एल. बोरा यांचे मार्फत शपथेवर सुरु –</u>**

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्रमांक ३३९ मधील २हे ५५आर व उर्वरित वाढीव जमीन मिळणेकरीता माझ्या दाव्यामध्ये मागणी केलेली नाही. आता मला माझ्या दाव्यातील कलम १२इ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, विशेषत: दावा कलम १ मध्ये "जंगम वहिवाटीप्रमाणे प्रत्यक्ष मोजणी होवून मोजणी अंती वाढीव क्षेत्राचे प्रतिवादी नंबर ०२ यांचेकडून विसारपावती ठरावाप्रमाणे विसारपावती करुन खरेदीखत लिहून नोंदवून देण्याचा हूकूम करण्यात यावा'' असे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, परंतु, विशेषत: त्यामध्ये मी गट क्रमांक ३३९ मधील २हे ५५आर याबाबत नमुद केलेले नाही. २हे ५५ आर इतक्या क्षेत्राची एकरी एक लाख प्रमाणे एकूण किंमत ६ लाख ३७ हजार ५०० रुपये इतके होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ मध्ये गट क्रमांक ३३९ या गटाची मोजणी झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीबाबत मी कोणत्याही वरीष्ठ कार्यालयामध्ये तक्रार किंवा अपील दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीचा नकाशा मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नकाशात गटाचे मुळ क्षेत्र दाखविले असून त्यात वाढीव क्षेत्र दाखविण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुळ ७/१२ उताऱ्याप्रमाणे गट क्रमांक ३३९ मध्ये कधीही वाढीव क्षेत्र अस्तित्वात नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला सदरचे वाढीव क्षेत्र खरेदी देण्याचा सौदा प्रतिवादी क्रमांक ०२ पंचकुला बबन जगताप यांनी केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सांगण्याप्रमाणे गट क्रमांक ३३९ मधील जमीनीसंदर्भात माझ्यामध्ये व प्रतिवादी क्रमांक ०२ यांच्यामध्ये ज्यावेळी व्यवहार झाला त्यावेळी प्रतिवादी क्रमांक ०२ यांचे पती व मुले अस्तित्वात होते.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ३३९ मधील मिळकत ही प्रतिवादी क्रमांक ०१ यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांचा मुळ व्यवसाय हा शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी प्रतिवादीं क्रमांक ०१ ते ०३ यांच्याकडून जमीन खरेदी केली त्यावेळी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ शेती करत होते व त्यांची

उपजिवीका ही शेतीवर अवलंबून होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मयत वादी क्रमांक ०१ सोमनाथ हा माझा भाऊ असून वादी क्रमांक ०३ ही माझी पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादींनी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांच्याकडून ज्या जमीनी खरेदी केल्या त्या पूर्वेकडील बाजुच्या खरेदी केलेल्या होत्या. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरच्या जमीनी हया उत्तरेकडून दक्षिण बाजूकडील होत्या. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ च्या पूर्वेला गट क्रमांक ३३८ आहे.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, मयत वादी क्रमांक ०१ सोमनाथ यांनी गट क्रमांक ३३९ पैकी ८० आर क्षेत्र हे सुरुवातीला खरेदी केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर ८० आर क्षेत्राच्या पूर्वेला गट क्रमांक ३३८ आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ पैकी २० आर क्षेत्र हे दुसऱ्यावेळी माझ्या नावावर खरेदी केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर २० आर क्षेत्राच्या पूर्व बाजूस मयत वादी क्रमांक ०१ सोमनाथ यांनी खरेदी केलेले ८० आर क्षेत्र आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ पैकी २० आर क्षेत्र हे तिसऱ्यावेळी माझ्या नावावर खरेदी केले. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ पैकी प्रतिवादी क्रमांक ०३ शकुंतला यांच्या नावावर असलेल्या ६० आर क्षेत्राच्या पूर्व बाजुस गट क्रमांक ३३८ आहे.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादींनी जे गट क्रमांक ३३९ मधील क्षेत्र खरेदी केलेले आहे ते क्षेत्र पूर्वेकडून पश्चिमेकडील बाजुचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व वादींच्या मालकीचे गट क्रमांक ३३९ मधील खरेदीचे एकूण क्षेत्र २हे २० आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मालकीच्या क्षेत्रामध्ये घराचे बांधकाम केले असून त्यात विहिर खोदली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी खरेदी केलेल्या क्षेत्र हे नेमके कुठे आहे याची जाणीव मला आहे.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावावर असलेल्या क्षेत्रावर मी कधीही फाळणी करुन घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व वादींच्या गट क्रमांक ३३९ मधील मिळकती हया भूमी अभिलेख यांच्या मार्फत मोजणी करुन घेतलेल्या नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की,

सदरच्या मिळकती हया टेपने मोजून घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्हा सर्व वादींच्या गट क्रमांक ३३९ मधील मिळकतींच्या प्रत्यक्ष वहिवाटी आम्हला माहित नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीची हददखुणा कायम करुन मोजणी करण्याबाबात खोटी मागणी केलेली आहे.

**<u>प्रश्न:–</u>** गट क्रमांक ३३९ मधील संपूर्ण मिळकत ४ हे ३५ आर पैकी तुमची मागणी ही २ हे ५५ आर करीता आहे ?

**<u>उत्तर:–</u>** गट क्रमांक ३३९ मधील मिळकतीपैकी माझी मागणी २हे ५५ आर व उर्वरीत अधिकचे क्षेत्राकरीता आहे.

हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ मधील ४ हे ३५ आर पैकी २ हे ५५ आर वजा केल्यास उर्वरीत क्षेत्र हे १ हे ८० आर इतके राहते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ मधील २हे २० आर इतके क्षेत्र वादींनी खरेदी केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे गट क्रमांक ३३९ मध्ये उर्वरित क्षेत्र २ हे ५५ आर शिल्लक नाही.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, मुळ दाव्यामध्ये मी पान क्रमांक ०४ येथे दावा मिळकतीचा विषय हा १हे ९५आर इतक्या क्षेत्राबाबात वाद असल्याचा उल्लेख केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत दाव्या मार्फत नेमक्या किती क्षेत्राची मागणी करत आहे याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक ०४ ते ०७ यांचे क्षेत्राशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्रमांक ०८ यांना विक्री केलेल्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्रमांक ०७ कढभने यांच्या २० आर क्षेत्राचा समावेश आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक ०८ हे सदर क्षेत्राच्या कब्जेवहिवाटीत आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदरचे क्षेत्र माइया कब्जेवहिवाटीस आहे.

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, मयत वादी क्रमांक ०१, वादी क्रमांक ०३ व मी असे आम्ही गट क्रमांक ३३९ मधील क्षेत्र वेगवेगळया तारखांना खरेदी केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतान्वये आम्हा वादींना सदर मिळकतींचा ताबा देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की,

प्रत्येक वेळी व तारखेला झालेल्या खरेदीखतान्वेय त्याचा ताबा आम्हाला देण्यात आला व उर्वरीत क्षेत्राची वहिवाट ही प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी केली. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक खरेदीखतावेळी खरेदीची रक्कम दिल्यानंतर खरेदीखतान्वेय त्याचा ताबा आम्हाला दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, विसार पावतीनुसार प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी विसारपावती नुसार क्षेत्राचा ताबा दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्रमांक ३३९ मधील माझ्या क्षेत्राची वहिवाट करण्यासाठी जात होतो व त्यावेळी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे त्यांच्या मिळकतीची वहिवाट करण्यासाठी येत असत. त्यामुळे वादींचे व प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांचे प्रमाचे व विश्वासाचे संबंध होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांचा आम्हा वादींवर विश्वास असल्याने त्यांनी त्यांचे क्षेत्र आम्हाला विक्री करण्याचा ठरविले. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राचे नाव महसूल दप्तरी नोंदविण्याकरीता प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांच्या प्रत्येकाने संमती घेतलेल्या होत्या.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्रमांक ०२ पंचफुला हया जमीनीची मशागत करण्याकरीता येत होत्या. मयत प्रतिवादी क्रमांक ०२ पंचफुला यांना लिहिता वाचता येत होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्रमांक ०२ पंचफुला यांना लिहीता वाचता येत नसल्यामुळे मी त्याचा गैरफायदा घेवून त्यांच्याकडून विसारपावतीचा खोटा कागद तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, सन २००७ मध्ये रक्कम रुपये ५० हजार ही मोठी रक्कम होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २००७ मध्ये रक्कम रुपये ५० हजार इतकी रक्कम माझ्याकडे होती हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्रमांक ०२ पंचफुला व माझ्यामध्ये गट क्रमांक ३३९ मधील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्रमांक ०२ पंचफुला यांना गट क्रमांक ३३९ मधील मिळकतीसंदर्भात व्यवहार करण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३३९ मधील मिळकती खरेदी घेतल्यानंतर खरेदीधारकांच्या नावांच्या नोंदी महसूल दप्तरी झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक ०८ यांच्या वहिवाटीमध्ये २हे १५ आर इतके क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक

३३९ मधील मिळकत विसारपातीच्या आधारे मोफत मिळावी म्हणून मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करुन पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी मा. न्यायालयाचे समक्ष खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/–

**(अनुश्री ब. फंड)**
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**जामखेड**.

दिनांकः– ०९/०३/२०२६
ठिकाणः– जामखेड